सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५४ | मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१८ नोव्हेंबर

- बाल लैंगिक शोषण, अत्याचार आणि हिंसेपासून बचाव करण्याचा जागतिक दिवस
- अण्णासाहेब किर्लोस्करांचे संगीत सौभद्र हे नाटक रंगभूमीवर आले.
- प्रभातचा पहिला रंगीत चित्रपट सैरंध्री प्रदर्शित झाला.
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन केले.
- 'व्ही. शांताराम' चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते यांचा जन्म.
- 'श्रीकांत वर्मा' हिन्दी कवी, पत्रकार व समीक्षक, राज्यसभा सदस्य यांचा जन्म.
- 'जितेंद्रनाथ गोस्वामी' भारतीय शास्त्रज्ञ यांचा जन्म.
- 'रंजन गोगोई' भारताचे ४६ वे सरन्यायाधीश यांचा जन्म.
- 'थोरले माधवराव पेशवे' मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा यांचे निधन.
- 'रामसिंह रतनसिंह परदेशी' स्वातंत्र्यसैनिक यांचे निधन.
- 'हणमंत नरहर जोशी' मराठी कथाकार व कवी

# नगरसेवक पदासाठी ४०७ उमेदवारी अर्जांचा महापूर

## नगराध्यक्षपदासाठी २८ अर्ज, किमान तिरंगी लढत होण्याचे स्पष्ट संकेत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर– पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवार, दि. १७ नोव्हेंबर अंतीम दिवस होता. त्यामुळे या दिवशी पालिकेत उमेदवारी अर्जांचा जणू महापूरच आल्याचे दिसून आले. नगरसेवक पदासाठी तब्बल ४०७, तर नगराध्यक्षपदासाठी २८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांची पालिकेत तोबा गर्दी झाली होती. अनेक उमेदवारांनी रॅली काढून शक्ती प्रदर्शन केले. रविवार दि. १६ नोव्हेंबर रोजी नगरसेवक पदासाठी २२५, तर नगराध्यक्ष पदासाठी ८ अर्ज दाखल झाले होते. यात सोमवारी नगरसेवक पदासाठी १५४, तर नगराध्यक्ष पदासाठी २० अर्जांची भर पडली आहे. सोमवारी उमेदवारांची चांगलीच धावपळ झाली. विविध प्रभागातून उमेदवारांनी रॅली काढली. उमेदवारांचे समर्थक व कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीने पालिका प्रांगण दुमदुमत होते. पालिकेच्या आवाराला यात्रेचे स्वरुप आले होते. मोठ्या प्रमाणात दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांवरून अनेक प्रभागांमध्ये चुरशीच्या लढती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**उबाठाकडून राधाबाई पवार नगराध्यक्षपदाच्या उमेदवार**

उबाठा कडून माजी नगरसेविका सौ. राधाबाई संजय पवार यांना नगराध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांना पक्षाने एबी फॉर्म दिला असल्याची माहिती, महाविकास आघाडीचे नेते प्रशांत निकम यांनी दिली आहे.

### 'शविआ'कडून जितेंद्र ठाकूर नगराध्यक्षपदाचे उमेदवार

खासदार स्मितताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व माजी आमदार कृषिभुषण साहेबरावदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील शहर विकास आघाडीकडून नगराध्यक्षपदासाठी जितेंद्र ठाकूर यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. त्यांना एबी फॉर्मही देण्यात आला आहे. जितेंद्र ठाकूर यांचे नाव निश्चित होताच राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आतषबाजी करून जल्लोष केला.

### शिवसेनेकडून डॉ. परिक्षित बाविस्कर नगराध्यक्षपदाचे उमेदवार

माजी आमदार शिरिषदादा चौधरी यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटाकडून नगराध्यक्षपदासाठी डॉ. परिक्षित बाविस्कर यांचे नगराध्यक्षपदासाठी नाव निश्चित करण्यात आले आहे. शिवसेनेकडून त्यांना आज ए.बी. फॉर्म देण्यात आला आहे. त्यांचे नाव निश्चित झाल्यानंतर शिवसेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# 'शविआ', शिवसेना, 'मविआ'तर्फे उमेदवारांची अधिकृत नावे जाहीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतीम दिवशी सोमवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी शहर विकास आघाडी, शिवसेना शिंदे गट व महाविकास आघाडीने त्यांचे अधिकृत उमेदवार जाहीर केले आहेत. नगरसेवकपदासाठी प्रभागनिहाय उमेदवारांची नावे अशी–

### शहर विकास आघाडी

प्रभाग १ (अ) कविता विजयसिंग राजपूत. (ब) नरेंद्र विष्णू चौधरी. प्रभाग २ (अ) देवेंद्र भानुदास कांबळे (ब) अफसाना मुख्तार खाटीक. प्रभाग ३ (अ) शोभाबाई भिवसन गढरे (ब) भरतकुमार सुरेश ललवाणी. प्रभाग ४ (अ) नंदा नरेंद्र संदानशिव (ब) इब्राहीम हबीब खाटीक. प्रभाग ५ (अ) हेमंत भास्करराव पवार (ब) शबनुरबी सलीम शेख. प्रभाग ६ (अ) हर्शल देवदत्त संदानशिव (ब) मनोज भाऊराव पाटील. प्रभाग ७ (अ) रेखा संजय पाटील (ब) घनश्याम जयवंत पाटील. प्रभाग ८ (अ) संजय बळवंत पाटील (ब) चेतना यज्ञेश्वर पाटील. प्रभाग ९ (अ) मयुरी पंकज साळी (ब) चेतन देवसिंग राजपूत. प्रभाग १० (अ) सचिन विभाकर कासार (ब) मनिषा संजय मराठे. प्रभाग ११ (अ) शारदा संजय पाटील (ब) विजय कहारू पाटील. प्रभाग १२ (अ) योगिता विजय पाटील (ब) प्रताप छबूलाल साळी. प्रभाग १३ (अ) जुबेदाबी नसिरोद्दीन शेख (ब) प्रवीण बारकू महाजन. प्रभाग १४ (अ) गिताबाई गणेश पाटील (ब) नीलेश उत्तम महाजन. प्रभाग १५ (अ) विनोद मधुकर कदम (ब) जयश्री अनिल पाटील. प्रभाग १६ (अ) राजेश शिवाजीराव पाटील (ब) विद्या संजय भदाणे. प्रभाग १७ (अ) स्वप्ना विक्रांत पाटील (ब) प्रताप अशोक शिंपी. प्रभाग १८ (अ) गणेश आनंद पवार (ब) अनिता विनोद लांबोळे.

### शिवसेना शिंदे गट

प्रभाग १ (अ) सरिता भरत पवार (ब) राजेंद्र श्याम यादव. प्रभाग २ (अ) माया कैलास लोहारे (ब) गायत्री प्रवीण पाटील. प्रभाग ३ (अ) पूजा रमेश शिंदे (ब) कृष्णा रामसिंग बहारे. प्रभाग ४ (अ) नीता नरेश कांबळे (ब) शेख नाविद शेख मुशिरोद्दीन, परेश रवींद्र उदेवार. प्रभाग ५ (अ) श्रीराम भगवान चौधरी (ब) सय्यद मिसबाह मनाजीरअली. प्रभाग ७ (अ) नयना कैलास पाटील (ब) अविनाश दगडू जाधव. प्रभाग ८ (ब) अपूर्वा जालंदर चौधरी. प्रभाग ९ (अ) कल्पना चंद्रकांत शर्मा (ब) पंकज पंडित चौधरी. प्रभाग १० (अ) कैलास रामलाल भावसार (ब) भाग्यश्री दीपक पाटील. प्रभाग १२ (अ) पुष्पा पंकज भोई (मोरे) (ब) सुयोग ज्ञानेश्वर धनगर. प्रभाग १३ (अ) उज्वला देविदास महाजन (ब) अनिल गंगाराम महाजन. प्रभाग १४ (अ) ज्योती पंकज शेटे (ब) प्रवीणकुमार शशिकांत पाठक. प्रभाग १५ (अ) सुनील चंद्रकांत भामरे (ब) मनिषा दीपक पाटील. प्रभाग १६ (अ) दीपक देविदास चौधरी (ब) सारिका सुभाष शिंपी. प्रभाग १७ (ब) साहेबराव वसंतराव पवार. प्रभाग १८ (अ) इरशाद सुनील तडवी (ब) आशा सुरेश महाजन.

### महाविकास आघाडी

**उबाठा गट–** प्रभाग १ (अ) इमरान शब्बीर पठाण. प्रभाग ३ (अ) सखुबाई अमृत भिल. प्रभाग ४ (अ) सुनंदा सुरेश मोरे. प्रभाग १३ (अ) वैशाली संजय महाजन (ब) आलिदखाँ इस्माईल पठाण. प्रभाग १४ (अ) अनिता गणेश वैद्य.

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)–** प्रभाग २ (अ) शारदा नारायण नकवाल. प्रभाग १५ (अ) प्रशांत मनोहर निकम (ब) सोनाली प्रशांत निकम.

**काँग्रेस–** प्रभाग ४ (अ) जिजाबाई सोमचंद संदानशिव. प्रभाग ५ (अ) तोहसीम अहमद अब्दुल तेली.

## उमेदवारी अर्जांमुळे पालिकेच्या तिजोरीत ३८ लाखांची भर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवाराकडे कोणतीही थकबाकी नाही असे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक होते. परिणामी उमेदवारांनी त्यांच्याकडील सर्व थकबाकी भरली आहे. यामुळे पालिकेच्या तिजरोजीत दहा दिवसात तब्बल ३८ लाख २५ हजार रुपयांची भर पडली आहे. घरपट्टी, पाणीपट्टीची थकबाकी असलेल्या उमेदवारांनी ७ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर दरम्यान ही रक्कम भरली आहे.

यामुळे थकबाकी वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा ताणही काही अंशी कमी झाला आहे.

# मद्यपी चालक असल्यास एसटीला लागणार ब्रेक!

## राज्य परिवहन महामंडळाचा मोठा निर्णय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात पुढील वर्षात दाखल होणाऱ्या नव्या बस चालकाजवळ ब्रेथ ॲनालायझर यंत्र बसविण्यात येणार आहे. या यंत्रामुळे चालकाने मद्यपान केले असल्याचे आढळल्यास बसचे इंजिन सुरू होणार नाही. म्हणजेच मद्यधुंद अवस्थेत बस चालवणे पूर्णपणे थांबवले जाईल. राज्य परिवहन महामंडळाकडून (एसटी) प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, नशेत असलेल्या चालकांमुळे होणाऱ्या अपघातांचा धोका टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे केवळ प्रवाशांचा विश्वासच वाढणार नाही, तर बस चालकांमध्येही जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण होईल. एसटीच्या ताफ्यात येणाऱ्या आठ हजार नव्या बस गाड्यांमध्ये ही प्रणाली अनिवार्य आहे. प्रत्येक बसमध्ये आधुनिक डिजिटल प्रणालीसह ब्रेथ ॲनालायझर बसविण्यात येईल.

नवीन बस खरेदी करारात तशी अट घालण्यात आली आहे. नव्या बस खरेदीसाठी तयार केलेल्या करारनाम्यातच ब्रेथ ॲनालायझर प्रणाली बसविणे बंधनकारक केले आहे. नव्या बस उत्पादक कंपनीनेच या यंत्राची बसवणी आणि तपासणी करून देणे आवश्यक आहे. पुढील वर्षभरात एसटी महामंडळाच्या ताफ्यात आठ हजार नव्या बस गाड्यांचा समावेश होणार आहे.

ब्रेथ ॲनालायझर म्हणजे नेमके काय ? 'ब्रेथ ॲनालायझर' हे एक आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. जे चालकाने श्वास घेताच अल्कोहोलचे प्रमाण तपासते. ठरलेल्या मर्यादपेक्षा जास्त प्रमाण आढळल्यास प्रणाली 'लॉक' होते. सुरक्षित प्रवासावर भर अनेकदा एसटी प्रवास करताना चालकाच्या स्थितीबद्दल प्रवाशांना शंका वाटत असे. पण या यंत्रणेमुळे प्रवाशांचा आत्मविश्वास वाढेल. सुरक्षित प्रवासाची हमी मिळेल. एसटी प्रशासनाचे उद्दिष्टच 'सुरक्षित प्रवास, विश्वासार्ह सेवा' असल्याचे अधिकारी सांगतात. मद्यपीचालकांनाअटकावबसणार या नव्या यंत्रणेमुळे मद्यधुंद अवस्थेत बस चालविणाऱ्या चालकांना अटकाव बसणार आहे. प्रवाशांच्या जीवाशी खेळणारे प्रकार आता थांबतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एसटीच्या ताफ्यात आठ हजार नव्या बसेस राज्य परिवहन महामंडळाकडे सध्या सुमारे १६ हजार बस आहेत. त्यापैकी जुने वाहन टप्प्याटप्याने बाद करून ८ हजार नव्या बस गाड्यांची खरेदी पुढील आर्थिक वर्षात होणार आहे. या पैकी पाच हजार बस गाड्यांमध्ये डिजिटल मॉनिटरिंग सेन्सरही लावण्यात येणार आहेत. मद्यधुंद चालकांमुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी ही यंत्रणा अत्यंत प्रभावी ठरेल.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...! जय स्वदेशी...!!

## पॅरोलवर टाकरखेडा येथे आलेल्या कैद्याचा उपचारादरम्यान मृत्यू

अमळनेर– नाशिक कारागृहात असलेल्या तालुक्यातील टाकरखेडा येथील कैद्याचा धुळे येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. विजय साहेबराव पाटील (वय ५०) असे त्याचे नाव आहे. तो पॅरोलवर टाकरखेडा येथे घरी भेटण्यासाठी आला होता. ही घटना शनिवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास घडली. विषारी द्रव्य प्राशन केल्याने मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

# दोनशे खोल्या, ११३५ किलो सोन्याचे मोर सिंहासन!

## एक गुप्त तळघर, कोहिनूर हिऱ्याने प्रकाशमान झालेल्या लाल किल्ल्याची रहस्यमयी कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जुन्या दिल्लीचा ऐतिहासिक लाल किल्ला सध्या जगभरात चर्चेत आहे. " लाल किल्ला " या शब्दाचा गुगल सर्च केल्यावर स्फोटाचे फोटो आणि बातम्या समोर येत आहेत. १० नोव्हेंबरच्या संध्याकाळी लाल किल्ल्याजवळ दहशतवादी हल्ला झाला. एका आत्मघाती बॉम्बस्फोटात एका कारमधून आलेल्या दहशतवाद्याने स्फोटक यंत्राचा स्फोट घडवून आणला. ज्यामुळे भीती आणि दहशत पसरली. सध्याच्या माहितीनुसार, या हल्ल्यात १० हून अधिक निष्पाप लोकांचे प्राण गेले आहेत.



डझनभर कुटुंबांवर एक दुःख ओढवले आहे. हा स्फोट त्याच लाल किल्ल्याजवळ झाला. जेथून पंडित जवाहरलाल नेहरूंनी पहिल्यांदा भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्या लाल किल्ल्याची रहस्यमयी कहाणी थोडक्यात.

मुघल सम्राट शाहजहानला आग्र्याऐवजी दिल्लीला आपली राजधानी बनवायची होती. त्याला राजधानीसाठी एका खास राजवाड्याची आवश्यकता होती. म्हणून त्याने १६३८ मध्ये लाल किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. हा किल्ला इतका मोठा आहे, की तो पूर्ण होण्यासाठी १० वर्षे लागली. २५० एकरांवर पसरलेला हा किल्ला मुघलांच्या भव्य वास्तुकलेचे प्रतीक आहे. यमुना नदीच्या काठावर बांधलेला हा किल्ला ३३ मीटर उंच भिंतीने वेढलेला आहे. लाल किल्ल्याला सहा मुख्य दरवाजे आहे. त्याचे प्रवेशद्वार लाहोर दरवाज्यातून आहे.

### किल्ल्याचे वैशिष्ट्ये

लाल किल्ल्याच्या बांधकामानंतर मुघल सम्राट शाहजहानने १६४७ मध्ये त्याच्या उद्घाटनासाठी विशेष सजावट करण्याचे आदेश दिले. राजवाड्याच्या मुख्य खोल्या जड पडद्यांनी सजवल्या गेल्या

### जगातील तत्कालिन महागडे सिंहासन

१६३८– ४८ या काळात लाल किल्ल्याच्या बांधकामाला १ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला. आजच्या काळात ते अब्जावधी आणि ट्रिलियन रुपयांचे असेल. आज लाल दिसणारा लाल किल्ला मूळतः लाल नव्हता. मूळतः लाल किल्ला पांढरा होता. मात्र, १९ व्या शतकात नूतनीकरणादरम्यान, ब्रिटिशांनी त्याचा रंग पांढऱ्यावरून लाल केला. रंगासोबतच त्याचे नावही बदलले. लाल किल्ल्याचे जुने नाव 'किला–ए–मुबारक' होते, नंतर ते लाल किल्ला म्हणून प्रसिद्ध झाले. शाहजहानने लाल किल्ल्यामध्ये एक खास सिंहासन बनवले होते. ज्याला 'मयूर सिंहासन' असे नाव देण्यात आले. त्याला तख्त–ए–तौस असेही म्हटले जात असे. सुमारे ११५० किलो सोने आणि २३० किलो मौल्यवान दगडांपासून बनवलेले हे सिंहासन दिवाण–ए–खासमध्ये ठेवण्यात आले होते. त्यावेळी ते जगातील सर्वात महागडे सिंहासन होते. असे मानले जाते, की कोहिनूर हिरा देखील त्याचा एक भाग होता. १६६५ मध्ये प्रसिद्ध परदेशी प्रवासी टॅव्हर्नियर यांनी त्याची किंमत सुमारे १० कोटी ७० लाख रुपये असल्याचे म्हटले होते.

# जानवे येथे पोलिसांकडून दोन गावठी दारू हातभट्ट्या उध्वस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तालुक्यातील जानवे येथे पोलिसांनी सोमवार दि. १७ नोव्हेंबर रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकून गावठी दारू हातभट्ट्या उध्वस्त केल्या आहेत. सुमारे साठ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करुन, दारू बनविण्याचे रसायन नष्ट केले आहे. या कारवाईतील दोन्ही आरोपींना पकडण्याचा प्रयत्न केला असता ते दोन्ही पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पहिल्या कारवाईत रवींद्र त्र्यंबक भिल (रा. जानवे) याच्या गावठी दारू हातभट्टीवर छापा घातला. त्याच्या ताब्यातील ३१ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात १०० लिटर क्षमतेचे लोखंडी ड्रम, २५० लिटर क्षमतेचे प्लास्टिक ड्रम आणि १० लिटर क्षमतेचा प्लाास्टिक कॅनचा समावेश आहे. जप्त केलेले रसायन व दारूचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले. उर्वरीत रसायन जागीच नष्ट करण्यात आले आहे.

दुसऱ्या कारवाईत मंगलबाई रवींद्र वडर या महिलेच्या गावठी दारू हातभट्टीवर छापा टाकला. यात २५ हजार ८०० रुपयांचा गावठी दारू गाळण्याचा मुद्देमाल जप्त केला. लोखंडी ड्रम, निळ्या प्लास्टिकचे ड्रम आणि १० लिटर क्षमतेचा पांढऱ्या रंगाचा कॅन जप्त करण्यात आले. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनरिक्षक शरद काकळीज व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. दोन्ही आरोपींविरूद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून गावठी दारू हातभट्यांवरील छाप्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# मसाला पान



## प्रेरणादायक बेंगलुरु की दो बहनों की प्रेरक कहानी :
# हंसी उड़ाने वालों को जवाब दे बनाया १०० करोड़ का बिजनेस

बेंगलुरु की सुहासिनी और अनिंदिता संपत ने अपने हौसले और मेहनत से ऐसी मिसाल कायम की, जिसने आलोचकों की बोलती बंद कर दी। लोग उनके काम पर हंसते थे, लेकिन इन बहनों ने हार नहीं मानी और आज उनकी कंपनी ' योगा बार ' १०० करोड़ रुपये के टर्नओवर वाली ब्रांड बन चुकी है। आइए जानते हैं उनकी प्रेरणादायक यात्रा।

### हंसी उड़ाने वालों को दिया करारा जवाब

सुहासिनी और अनिंदिता को बचपन से हेल्दी खाने का शौक था। जब उन्होंने हेल्दी स्नैक्स का बिजनेस शुरू किया, तो लोग उनका मजाक उड़ाते थे। लेकिन दोनों ने आलोचनाओं को नजरअंदाज कर अपने सपने को साकार किया और देश का नाम रोशन किया।

### अमेरिका में पढ़ाई और बिजनेस आइडिया का जन्म

दोनों बहनों ने अमेरिका में अपनी पढ़ाई पूरी की और वहां नौकरी भी की। न्यूयॉर्क में योगा क्लासेस के दौरान अनिंदिता को भूख लगने पर एक आइडिया आया। उन्होंने कहा, "अगर बिजनेस शुरू किया, तो हेल्दी एनर्जी बार बनाऊंगी और नाम होगा 'योगा बार'। सुहासिनी को यह नाम पसंद आया, और उन्होंने इसे तुरंत ट्रेडमार्क करवा लिया।

### चार साल बाद शुरू हुआ योगा बार

' योगा बार ' नाम को ट्रेडमार्क करने के चार साल बाद २०१२ में दोनों बहनें भारत लौटीं। उन्होंने तीन साल तक गहन रिसर्च की और २०१५ में पहला प्रोडक्ट, मल्टीग्रेन एनर्जी बार, लॉन्च किया। इसके बाद २०१८ में प्रोटीन बार बाजार में आया।

### मां के किचन से शुरू हुआ सफर

शुरुआत में दोनों ने मां के किचन में एनर्जी बार बनाए और दोस्तों को दीवाली गिफ्ट के रूप में भेजे। फिर बेंगलुरु के योगा सेंटर्स पर पॉप-अप स्टॉल्स लगाकर बिक्री शुरू की। धीरे-धीरे उन्होंने अपने प्रोडक्ट्स को रंग-बिरंगे डिजाइनों के साथ और आकर्षक बनाया।

### आलोचनाओं को बनाया ताकत

जैसे-जैसे योगा बार की लोकप्रियता बढ़ी, आसपास के दुकानदार और लोग उनकी मेहनत का मजाक उड़ाने लगे। लेकिन सुहासिनी और अनिंदिता ने हिम्मत नहीं हारी। अपनी मेहनत और लगन से उन्होंने आलोचकों को गलत साबित किया।

### १०० करोड़ का साम्राज्य और भविष्य की उड़ान

आज योगा बार के प्रोडक्ट्स अमेरिकी एफडीएद्वारा अप्रूव्ड हैं। २०२१-२२ में कंपनी का टर्नओवर ६८ करोड़ रुपये था, जो अब बढ़कर १०० करोड़ रुपये हो चुका है। २०२३ में आयटीसी ने कंपनी के ४० टक्के स्टेक को १७५ करोड़ रुपये में खरीदा, जो उनकी सफलता का सबूत है।



# जगातील सर्वांत महागडा तांदूळ
## १२ हजार ५०० रुपये प्रतिकिलो भाव; कुठे मिळतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय आहारात तांदळाचे महत्त्व अनमोल आहे. कारण तो शरीराला ऊर्जा आणि आवश्यक पोषक तत्त्वे देतो. पण जगात असा एक तांदूळ आहे, की ज्याचा भाव ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. कारण हा तांदूळ जगातील सर्वांत महागडा तांदूळ आहे. त्याचा भाव प्रतिकिलो १२ हजार ५०० रुपये आहे. हा तांदूळ कुठे मिळतो? आणि त्याची वैशिष्ट्ये नेमकी काय आहेत?

### उत्पादन आणि भावाचे कारण

हा तांदूळ जपानमधील कोशिहिकारी प्रदेशात पिकविला जातो. त्याचे नाव ' किनमेमाई प्रीमियम ' असे आहे. या ठिकाणची विशिष्ट माती आणि हवामान या तांदळाच्या उत्पादनासाठी अत्यंत अनुकूल मानले जाते. या तांदळाचे उत्पादन अतिशय कमी प्रमाणात होते. त्याची मागणी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड आहे. ज्यामुळे त्याचा भाव खूप जास्त आहे. जपान हा तांदूळ जगाला पुरवितो. शिवाय उत्पादन कमी असल्याने आपोआप त्याचा भावही



जास्त आहे.

### खास प्रक्रिया आणि वैशिष्ट्ये

किनमेमाई प्रीमियम तांदळाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी तो एका विशेष प्रक्रियेतून जातो. त्याची निवड हाताने केली जाते. त्याची पृष्ठभागावरील स्टार्च आणि कोंडा काढून टाकण्यासाठी विशेष प्रक्रिया केली जाते. यामुळे हा तांदूळ शिजवण्यापूर्वी धुण्याची गरज नसते. शिवाय तो आरोग्यासाठी ही चांगला समजला जातो. त्यातून अनेक पौष्टीक गोष्टी शरिराला मिळतात. तसा हा तांदूळ दुर्मीळ म्हणावा लागेल.

### आरोग्याचे फायदे

या तांदळात लिपोपॉलीसेकेराइड्स (एलपीएस) नावाचे खास मिश्रण असते. एलपीएस रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करते. अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करते, असा दावा केला जातो. २०१६ मध्ये जेव्हा ' किनमेमाई प्रीमियम ' लाँच करण्यात आला तेव्हा ८४० ग्रॅमच्या पॅकेटची किंमत नऊ हजार ४९६ जपानी येन म्हणजे भारतीय चलनात पाच हजार ४९० रुपये इतकी होती. आता प्रतिकिलो त्याची किंमत १२ हजार ५५७ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. ज्यामुळे तो जगातील सर्वांत महागडा तांदूळ ठरला आहे.

# कपूर कुटुंबात सर्वांत जास्त शिक्षण कोणाचे?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कपूर कुटुंबातील सदस्यांमध्ये शिक्षणाचा दर्जा विविध प्रकारचा असून, सर्वांत जास्त शिक्षण रिद्धिमा कपूरचा आहे. रिद्धिमा कपूरने बॉम्बे स्कॉटिश स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर लंडन येथील अमेरिकन इंटरकॉन्टिनेंटल युनिव्हर्सिटीमधून बॅचलर ऑफ डिझायनिंग ॲण्ड मार्केटिंग पदवी प्राप्त केली आहे. त्याशिवाय तिने जेमोलॉजीमध्येही कोर्सेस केले आहेत. त्यामुळे शिक्षणाबाबत रिद्धिमा कपूर ही कपूर कुटुंबातील सर्वाधिक शिक्षित सदस्य मानली जाते. पृथ्वीराज कपूर यांनी लयल्यपूर खालसा कॉलेज आणि एडवर्डेस कॉलेज, पेशावर येथून बी.ए.पदवी मिळविली आहे. राज कपूर यांनी कोलोनेल ब्राऊन केंब्रिज स्कूल, सेंट झेविअर्स कॉलेजिएट आणि कॅम्पियन स्कूलमध्ये शिक्षण घेतले होते. पण त्यांचा शिक्षणाचा प्रवास फार पुढे गेला नाही. कारण त्यांनी लवकर अभिनय करायला सुरूवात केली.

रणधीर कपूर, ऋषी कपूर यांनी मुंबईतील कॅम्पियन स्कूलमध्ये बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. पण नंतर अभिनय करायला सुरूवात केली. रणबीर कपूर हे कपूर कुटुंबातील एक प्रभावी अभिनेते असून, त्यांनी बॉम्बे स्कॉटिश स्कूलमधून बारावी शिक्षण घेतले आणि नंतर मुंबईतील एच.आर. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्समधून पदवी प्राप्त केली. त्यांनी नंतर न्यूयॉर्कमधून अभिनय आणि चित्रपट निर्मितीचेही शिक्षण घेतले आहे. तर करिश्मा कपूरने फक्त दहावीपर्यंत शिक्षण घेतले आहे.

शम्मी कपूर यांनी नवीन एरा स्कूल आणि रामनारायण रुइया कॉलेजमध्ये थोडके शिक्षण घेतले; शशी कपूर यांनी डॉन बॉस्को स्कूल आणि सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. पण दहावीही पूर्ण केले नाहीत. शेवटी कपूर कुटुंबातील सर्वांत जास्त शिक्षित सदस्य रिद्धिमा कपूर असून, काही सदस्यांनी फक्त दहावी किंवा बारावीपर्यंत शिक्षण घेतले आहे. काहींनी कॉलेज पदवीही घेतली आहे. परंतु अभिनय करिअरसाठी शिक्षणाचा टप्पा लवकर सोडला आहे. या परिवारामध्ये शिक्षणाची पातळी वेगवेगळी असून, सर्वाधिक शिक्षण रिद्धिमा कपूरचे आणि रणबीर कपूरचे आहे तर कमी शिक्षण करिश्मा कपूर, शशी कपूर यांचे आहे.

# सातपुड्यात मुबलक आंबा; उत्पादन बहरण्याची अपेक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



खानदेशात सातपुड्यातील आंबा बागा यंदा मुबलक किंवा चांगल्या पावसामुळे बहरतील, अशी अपेक्षा आहे. सातपुड्यात आंबा बागा अधिक आहेत. गेल्या वर्षी नैसर्गिक समस्या व ढगाळ वातावरण यामुळे बागा संकटात होत्या. पिकातील मोहर गळून पडला होता. यामुळे पुढे उत्पादन कमी आले. यंदा मात्र वातावरण अधिकाधिक दिवस निरभ्र राहून गारठा राहावा, असे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे.

सातपुड्यात जळगावमधील रावेर, यावल, चोपडा, धुळ्यातील शिरपूर, नंदुरबारमधील तळोदा, शहादा, अक्कलकुवा, धडगाव या भागांत आंबा बागा अधिक आहेत. मात्र या बागांना नैसर्गिक समस्या, रोगराईचाही विळखा पडत असल्याचा आजवरचा अनुभव आहे. सातपुडा पायथा परिसरातील आंबा बागांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर बुरशीनाशकांची फवारणी केली जाते. ढगाळ वातावरण व अन्य समस्यांमुळे हा परिणाम होत असल्याचे शेतकरी म्हणतात. मात्र यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक फटका दरवर्षी सहन करावा लागतो.

सातपुड्यात अनेक वर्षांपासून आंबा बागा वाढीस लागलेल्या आहेत. नंदुरबारमधील तळोदा तालुक्यातील रांझणी, प्रतापपूर, गोपाळपूर, रोझवा पुनर्वसन भागातील शेतकरी पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक पिकांकडे वळले आहेत. या परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आंब्याचे उत्पादन घेत आहेत. गेल्या वर्षी सतत ढगाळ वातावरण राहिल्याने आंबा बागांत बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाला. गारठा कमी-जास्त होत होता. त्यामुळे आंब्यांना तुडतुडे, फुलकिडे या बुरशीजन्य रोगांचा विळखा बसला. काही आंबा बागांवर भुरी या बुरशीचा प्रादुर्भाव झालेला दिसून आला होता. ढगाळ हवामानामुळे रोगराईचा झपाट्याने प्रसार होऊन आंबा मोहराचे देठ, फुले यावर प्रतिकूल परिणाम झाला. शेतकरी आंबा पिकाच्या संरक्षणावर विशेष मेहनत घेत असून, निरभ्र व पुरेसा सूर्यप्रकाश असलेले वातावरण राहिल्यास बुरशीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होणार आहे.

### लिंबू बागांतही समस्या

खानदेशात लिंबू बागाही वाढल्या आहेत. जळगावातील भडगाव, चाळीसगाव, एरंडोल, पाचोरा, अमळनेर, पारोळा, धुळ्यातील साक्री, धुळे, नंदुरबारमध्ये तळोदा, अक्कलकुवा, नवापूर आदी भागांत लिंबू पीक आहे. काही परिसरात लिंबू बागांतही रोगराई दिसत असल्याने बुरशीनाशकांची फवारणी केली जात असून, त्यांचीही निगा राखली जात आहे.

# आठवड्यानंतरही भाज्या ताज्या ठेवायच्या?
## जपानी ट्रिक, साधी-सोपी ट्रिक वापरून पाहाच!

फ्रीजमध्ये ठेवलेल्या भाज्या अनेकदा दोन ते तीन दिवसांत सुकतात किंवा त्यांची चव गमावतात. परंतु जपानी लोकांनी या समस्येवर एक नैसर्गिक आणि स्मार्ट उपाय शोधला आहे. त्यांची पद्धत केवळ भाज्या दीर्घकाळ ताज्या ठेवत नाही तर त्यांची चव, रंग आणि पोषण देखील टिकवून ठेवते. जर तुम्हालाही भाज्या वारंवार खराब होत असल्याचा त्रास होत असेल तर ही सोपी जपानी पद्धत शिका. यामध्ये योग्य तयारी, योग्य आर्द्रता संतुलन, नैसर्गिकरित्या गुंडाळणे आणि फ्रीजमध्ये योग्य ठिकाणी भाज्या साठवणे समाविष्ट आहे. यामुळे अन्नाचा अपव्यय कमी होईलच, शिवाय तुमचे स्वयंपाकघर अधिक पर्यावरणपूरक आणि सेंद्रिय देखील होईल.



### भाज्या साठवण्याची जपानी पद्धत

रेफ्रिजरेटरमध्ये ठेवण्यापूर्वी भाज्या व्यवस्थित स्वच्छ करणे आणि वेगळ्या करणे आवश्यक आहे. डाग किंवा जखम असलेल्या भाज्या प्रथम वापरल्या पाहिजेत. जास्त ओलावा साचू नये म्हणून रबर बँड किंवा खराब झालेले पाने काढून टाका.

### कोरड्या भाज्या साठवा

जर त्यावर घाण किंवा धूळ असेल तर त्या हलक्या हाताने धुवा, परंतु साठवण्यापूर्वी त्या पूर्णपणे वाळवा. ओल्या भाज्या लवकर कुजू शकतात.

पालेभाज्यांचे देठ कापू नका. पालक, धणे किंवा मेथी यांसारख्या पालेभाज्यांचे देठ काढू नका. यामुळे त्यांना ओलावा टिकवून ठेवण्यास आणि जास्त काळ हिरवे राहण्यास मदत होते

### योग्य आर्द्रता संतुलन राखा

जपानी तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे "योग्य आर्द्रता संतुलन". भाज्या सुती कापड, मलमल किंवा कागदी टॉवेलमध्ये गुंडाळा. हिरव्या भाज्यांसाठी, कापड थोडे ओले ठेवा, तर मशरूम किंवा बेरीसाठी, कोरडे कापड चांगले.

हवाबंद पिशव्यांमध्ये भाज्या साठवल्याने इथिलीन वायू अडकतो, ज्यामुळे त्या लवकर कुजतात. योग्य हवा वाहू देण्यासाठी त्या श्वास घेण्यायोग्य कापडाच्या किंवा जाळीच्या पिशव्यांमध्ये साठवा.

### कोणत्या भाज्या

रेफ्रिजरेटरमध्ये ठेवाव्यात ब्रोकोली, फ्लॉवर, वांगी, शतावरी, बीन्स, लेट्यूस आणि बेरी यासारख्या भाज्या थंड तापमानात ताज्या राहतात. त्या रेफ्रिजरेटरच्या भाज्यांच्या ड्रॉवरमध्ये ठेवा.कांदे, बटाटे, टोमॅटो आणि लसूण कधीही फ्रिजमध्ये ठेवू नका. थंडीमुळे ते कडक किंवा बेस्वाद होऊ शकतात. त्यांना थंड, कोरड्या जागी ठेवा.

### दर काही दिवसांनी तपासा

तुमच्या रेफ्रिजरेटरमध्ये ठेवलेल्या भाज्या दर दोन ते तीन दिवसांनी तपासा. जर कापड ओले झाले तर ते बदला. जर पाने कोमेजत असतील तर कापड हलके ओले करा. या छोट्याशा प्रयत्नाने, भाज्या दीर्घकाळ ताज्या राहतातच, शिवाय अन्नाचा अपव्ययही कमी होतो.

# डक वर्थ लुईस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका कारागिराने फ्रान्सचा राजा लुईस याला वीस किलो सोन्याचे बदक बनवून दिले. त्याच्या डोळ्याच्या जागी अत्यंत मौल्यवान माणके जडवलेली होती. त्या बदकाची कीर्ती सर्वत्र पसरली. तत्कालीन इंग्लंडच्या राणीला ते बदक आपल्याकडे असावे, असे वाटू लागले. योगायोगाने तसे घडण्याची शक्यता निर्माण झाली.
एका युद्धात स्पेनने फ्रान्सचा पराभव केला. लुईस राजाला बंदी बनविले. ज्या जहाजातून लुईसला नेले जात होते त्यावर ब्रिटिश आरमाराने हल्ला केला. जिंकल्यामुळे लुईस त्यांच्या ताब्यात आला. राणीला ही बातमी कळताच तिने लुईसला लंडनमधे आणवले. त्याला फ्रान्सला परत पाठविण्याची ऑफर दिली. परत फ्रान्सला जाण्याच्या आनंदात लुईसने त्या बदल्यात राणीला काय हवे ते देण्याचे बोलून दाखविले. राणीने तत्काळ ते सोन्याचे बदक हवे असल्याचे सांगितले. हे जरा जास्त होतेय असे वाटले. तरी लुईसने आपला शब्द पाळला. आपल्या प्रधानाला ते बदक इंग्लंडला पाठविण्यास सांगितले. येथे बदक इंग्लंडला पोहोचले. त्या दिवशी लुईसची सन्मानाने फ्रान्सला रवानगी झाली. त्या बदकाएवढी लुईसची किंमत ठरल्याने ते बदक ' डक वर्थ लुईस ' नावाने ओळखले जाऊ लागले.
राणीच्या ताब्यात जरी ते किमती बदक आले, तरी तिला ते ओबडधोबड वाटले. तिच्या संग्रहातील अन्य उच्च दर्जाच्या शोभेच्या वस्तूत ते ' कुरुप वेडे ' दिसत होते. तसेच आपण ते मागण्यात मनाचा हीनपणा दाखविला, अशी रुखरुख तिला लागली होती. तेव्हा काहीतरी बहाण्याने ते बदक परत करावे, असे तिने ठरविले. त्या काळात फ्रान्स आणि इंग्लंडमधे संबंध बरे असल्याने खेळांचे सामने भरत. त्या खेळांपैकी एका खेळात फ्रान्स हमखास विजयी होई, तेव्हा त्या खेळात विजयी ठरणाऱ्या संघाला ते बदक भेट देण्यात येईल, असे तिने जाहीर केले. लुईसला बदक परत मिळण्याची संधी निर्माण झाल्याने आनंद झाला. सामना सुरू झाला. मात्र दोन मिनिटांत जोरदार पावसाला सुरूवात झाली. सायंकाळपर्यंत खेळ होऊ शकला नाही. राणीने सामन्याच्या पंचांना जवळ बोलावून काहीतरी गुफ्तगू केले. पंचांनी काहीतरी गडबडगुंडा निकष लावून फ्रान्सच्या संघाला विजयी घोषित करून राणीच्या हस्ते ते सुवर्णबदक फ्रान्सच्या संघाच्या हवाली केले. तेव्हापासून खेळ पावसामुळे पुरा होऊ शकला नाही, तर काहीतरी थातूरमातूर निकष लावून विजयी कोण ते घोषित केले जाऊ लागले व त्या सामन्याचा निकाल ' डक वर्थ लुईस ' पद्धतीने लागला, असे जाहीर करण्याची प्रथा पडली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ‘पीएमओ’ ऑफिसच्या तोतया सचिवास अटक

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या कार्यक्रमातील घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या एका कार्यक्रमात पीएमओ ऑफिसच्या तोतया सचिव व बॉडिगार्डला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही घटना तिसगाव येथे घडली. विशेष म्हणजे या तोतया सचिवाने मुख्यमंत्र्यांकडून सत्कारही करुन घेतला. या घटनेने राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस छत्रपती संभाजीनगर शहराच्या दौऱ्यावर होते. धुळे सोलापूर रोडवर तिसगाव येथे एका कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. या विवाह सोहळ्यात एक व्यक्ती पंतप्रधान कार्यालयाचा (पीएमओ ऑफिस) सचिव म्हणून फिरत होता. एवढेच नाही तर त्याने मुख्यमंत्र्यांसमोर आपला सत्कारही करून घेतला. पोलिसांना त्याच्यावर संशय आला. त्याची चौकशी केली असता धक्कादायक बाब उघडकीस आली. त्याच्या सुटकेसमध्ये ‘भारत सरकार’ अशी मराठी आणि इंग्रजी पाटी व राष्ट्रध्वज आढळून आला आहे. पीएमओ सचिव म्हणून तोतयागिरी करणाऱ्यासह त्याच्या बॉडीगार्ड विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक भारत ठोंबरे (रा. दिल्ली मूळ उंदरी ता. केज, जि. बीड) असे मुख्य आरोपीचे नाव आहे. तर विकास प्रकाश पांडागळे (रा.पुणे) असे बॉडीगार्ड म्हणून मदत करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दोघांनाही बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांकडून आता या दोघांची चौकशी सुरु आहे. यापूर्वी त्यांनी पीएमओ कार्यालयाचे सचिव असल्याचे भासवून कोणाला गंडा घातला आहे का ? याची तपासणी सुरु आहे.

# कॉलेजपासूनच ठरवले होते लक्ष्य!

## सहा प्रयत्नांनंतर संस्कृती झाल्या ‘आयएएस’ अधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संस्कृती त्रिवेदी यांनी यूपीएससी परीक्षा सहाव्या प्रयत्नात १७वी रँक मिळवून उत्तीर्ण केली. दिल्ली विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या संस्कृतीने कॉलेजमध्ये असतानाच आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यांचे ध्येय स्पष्ट होते आणि इरादे मजबूत होते.

संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा देशातील सर्वात कठीण परीक्षा मानली जाते. ही परीक्षा उत्तीर्ण होऊन संस्कृती आयएएस झाली. जिद्द आणि चिकाटीने तिने अभ्यासावर लक्ष केंद्रीत करून हे यश प्राप्त केले. चला तर जाणून घेऊया तिची यशोगाथा...

संस्कृती त्रिवेदी या बिहारमधील जमुई येथील रहिवासी आहेत. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. यूपीएससी सीएसई २०२४ मध्ये त्यांनी आपल्या सहाव्या प्रयत्नात ऑल इंडिया रँक १७ मिळविली. यापूर्वीही त्यांनी २०२२ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली होती. मात्र, त्यावेळी मिळालेली रँक कमी असल्याने त्या आयएएस अधिकारी बनू शकल्या नव्हत्या. तरीही, त्यांना स्वतःवर विश्वास होता आणि म्हणूनच त्यांनी पुन्हा परीक्षा दिली. अखेरीस त्यांच्या मेहनतीला यश आले.

सतरावी रँक मिळवून इतिहास रचला

२०२२ मध्ये त्यांना सरकारी नोकरी मिळाली होती. बिहारची कन्या संस्कृती त्रिवेदी यांनी यूपीएससी सिव्हिल सेवा परीक्षा २०२४ मध्ये १७ वी रँक मिळवून इतिहास रचला होता. साधारणपणे सहाव्या प्रयत्नापर्यंत उमेदवार थकतात. मात्र, त्यांच्यासाठी हाच प्रयत्न गेमचेंजर ठरला. संस्कृतीने यूपीएससी ऑप्शनल विषय म्हणून राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध निवडले होते. संस्कृती त्रिवेदी यांनी २०२२ मध्ये पहिल्यांदा यूपीएससी परीक्षा क्रॅक केली होती. त्यावेळी त्यांची रँक ३५२ वी होती. त्या आधारावर त्यांची इंडियन डिफेन्स अकाउंट्स सर्व्हिससाठी निवड झाली होती.

यूपीएससी सीएसई परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी आयएएस संस्कृती त्रिवेदी दररोज १५ तास अभ्यास करत होत्या. त्यांनी वेळेचे व्यवस्थापन आणि शिस्तीला खूप महत्त्व दिले. यामुळे त्यांना प्रत्येक विषयाला पुरेसा वेळ देता आला. बिहारमधील जमुई येथील रहिवासी असलेल्या संस्कृती त्रिवेदी यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमधून शिक्षण घेतले आहे. राज्यशास्त्रात पदवी घेतल्यानंतर त्यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली होती. आयएएस अधिकारी बनण्याचे त्यांचे ध्येय एकदम स्पष्ट होते.

भारतात दरवर्षी लाखो तरुण यूपीएससी परीक्षेचा फॉर्म भरतात. त्यापैकी केवळ सुमारे १ हजार जणच तिन्ही टप्पे यशस्वीपणे पार करून सरकारी अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतात.



# विवाहबाह्य संबंधांमुळे गुप्तहेरांचे उद्योग तेजीत!

## नेमकी काय काय आहेत कारणे ? वाचा सविस्तर..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गेल्या काही वर्षांमध्ये समाजमाध्यमांचा अतिवापर, कार्यालयांमध्ये कामाचा वाढता व्याप, दाम्पत्यामधील तुटलेला संवाद आदी कारणांमुळे पती-पत्नीच्या नात्यात दुरावा निर्माण होऊ लागला आहे. भावनिक जवळीक साधण्यासाठी अन्य व्यक्तीचा शोध सुरू होतो. त्यातून विवाहबाह्य संबंध प्रस्थापित होतात. महानगरांमध्ये अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत आहेत. दाम्पत्यांमध्ये परस्परांवर संशय बळावत आहेत. या संशयाची खातरजमा करण्यासाठी आणि जोडीदाराविरोधात पुरावे गोळा करण्यासाठी खासगी गुप्तहेर संस्थांची मदत घेण्याकडे कल वाढत आहे.

मोबाइल आणि समाज माध्यमाच्या अती वापरामुळे पती- पत्नीच्या नात्यामध्ये दुरावा निर्माण होत आहे. विवाहबाह्य संबंध वाढत असल्याचा दावा एका डिटेक्टीव्ह एजन्सीने मुंबई येथे एका पत्रकार परिषदेत केला आहे. घटस्फोटासाठी केवळ संशय नाही, तर ठोस पुरावे लागतात. त्यामुळेच विवाहबाह्य संबंधांचे पुरावे गोळा करण्यासाठी खासगी गुप्तहेर संस्थांची मदत घेण्याकडे कल वाढला आहे. विवाहबाह्य संबंधांविषयीच्या विविध बाबींवर लक्ष वेधण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये घटस्फोटांच्या प्रमाणात कमाली वाढ झाली आहे. त्यात विवाहबाह्य संबंधांमुळे घटस्फोटापर्यंत पोहचणाऱ्यांचे प्रमाण साधारणतः ५० टक्के आहे. लग्न झाल्यावर अवघ्या काही महिन्यांनंतर घटस्फोटासाठी अर्ज केल्यानंतर पुरावे गोळा करण्यासाठी गुप्तहेर संस्थांची मदत घेतली जाते. काही प्रकरणांचा अभ्यास केल्यानंतर कार्यालयामध्ये वाढत्या कामाच्या व्यापामुळे पती-पत्नी एकमेकांना वेळ देऊ शकत नाहीत. तसेच भावनिक गोष्टींसाठी भागीदार शोधला जातो. पुढे हे संबंध वाढतात, असा दावा त्यांनी केला. जोडीदाराशी बांधिलकी असलीच पाहिजे हा विचार तरुणांमध्ये दिसत नाही. त्याच्यात किंवा तिच्यात आता तितकासा रस नाही. समाधान, आनंद देणारा अन्य पर्याय उपलब्ध आहे. हा तरुणांच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा भाग असला तरीही समाजमाध्यमांचा अतिवापर आणि इतर ठिकाणी सुरू असलेली भावनिक गुंतवणूक यामुळे विवाहबाह्य संबंध प्रस्थापित होतात. अशावेळी जोडीदार एकमेकांवर आरोप करतात. मात्र, घटस्फोट घेण्यासाठी संशयाऐवजी पुरावे गोळा करण्यावरही भर दिला जातो. त्यासाठी अनेक जण खासगी गुप्तहेर संस्थांची मदत घेतात.

एका डॉक्टर दाम्पत्याचा घटस्फोटाचा अनुभव कथन करताना सांगण्यात आले, की लग्नाच्या पहिल्या दिवसापासून पत्नी- पतीकडे दुर्लक्ष करीत होती. त्यानंतर मुलाचा जन्म झाला. त्याचे संगोपन करण्यास ती टाळाटाळ करू लागली. पत्नी रात्री उशिरापर्यंत समाज माध्यमाचा वापर करत होती. रुग्णांवरील तातडीच्या उपचारासाठी रुग्णालयात जाण्याच्या बहाण्याने ती घराबाहेर पडायची. या प्रकारामुळे पती हैराण झाला होता. तिला जाब विचारताच मानसिक, शारीरिक छळ, हुंडाबळी प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची धमक्या महिलेने दिली. अखेर तिचे विवाहबाह्य संबंध असल्याची कुणकुण लागताच पतीने खासगी गुप्तहेर संस्थेची मदत घेऊन पुरावे गोळा केले. त्यानंतर न्यायालयात पुरावे सादर करून घटस्फोट घेतला. तिला पोटगी आणि मुलाचा ताबा मिळाला नाही.

# लाडक्या बहिणींना शासनाकडून दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ई केवायसी करणे बंधनकारक केले आहे. यासाठी १८ नोव्हेंबरपर्यंत अंतीम मुदत देण्यात आली होती. मात्र, आता ई- केवायसीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. ही मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसात राज्यातील नैसर्गिक आपत्ती तसेच योजनेतील तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र भगिनींना ई- केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आलेली नाही. या अडचणींनी गांभिर्याने नोंद घेण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने ही मुदतवाढ दिली आहे. याबाबतची घोषणा मंत्री आदिती तटकरे यांनी केली आहे. यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# संडे स्पेशल नाश्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खव्याचे मेदू वडे बनविण्यासाठी रवा, दही, पाणी, हिरव्या मिरच्या, आले, कढीपत्ता, कांदा, मीठ, बेकिंग सोडा आदी इत्यादी साहित्य लागते. रवा मेदू वडा बनवण्यासाठी सर्वप्रथम एका बाऊलमध्ये रवा, दही आणि थोडे पाणी टाकून घट्टसर पीठ मिसळून घ्या. तयार पीठात मीठ, हिरव्या मिरच्या, आले, कढीपत्ता आणि कांदा घालून मिक्स करा. १५ ते २० मिनिटे झाकून ठेवा. जेणेकरून रवा छान फुलून येईल. मेदू वडा बनवण्यासाठी बारीक खव्याचा वापर करा. आता या मिश्रणात बेकिंग सोडा आणि पाणी मिक्स करा. यात डाळीची पेस्ट देखील टाकता येते. पॅनमध्ये तेल चांगले गरम करून त्यात वडे गोल्डन फ्राय होईपर्यंत तळून घ्या. जास्त तळले, की वड्यांना कडू चव येते त्यामुळे ते जास्त तळू नये. सांबार आणि चटणीसोबत गरमागरम कुरकुरीत मेदू वड्यांचा आस्वाद घ्या. तुम्ही संडेला हा खास नाश्ता बनवा. लहान मुलांना खूप आवडेल. **टीप-** रवा भिजवताना दही आणि पाण्याचे प्रमाण योग्य ठेवा. नाहीतर मिश्रण बिघडते. तसेच वडा तळताना फुटतो.

# भारताचा ‘गोल्ड किंग’ ; ६० देशांमध्ये व्यवसाय

## छोट्या गॅरेजमधून केली सुरुवात; वडिलांकडून मिळाली प्रेरणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याच्या किमतीत वाढ झाल्याने, जगभरातील श्रीमंत व्यक्ती संबंधित व्यवसायाकडे लक्ष देत आहेत. म्हणूनच अलिकडच्या काळात देशातील अनेक प्रमुख व्यावसायिकांनी दागिन्यांचे ब्रँड लाँच केले आहेत. देशात सोन्याच्या व्यापारात अनेक कंपन्या सहभागी आहेत. देशातील विविध ब्रँडद्वारे सोन्याचे दागिने विकले जातात. मात्र, देशातील सर्वात मोठा सोन्याचे दागिने निर्यातदार कोण तुम्ही त्यांचे नाव ऐकले असेल. त्याहूनही उल्लेखनीय म्हणजे, या सोन्याच्या व्यावसायिकाने भारतात राहून आपला व्यवसाय ६० देशांमध्ये वाढवला आहे.

देशातील सर्वात मोठी सोन्याचे दागिने निर्यात कंपनी राजेश एक्सपोर्ट लिमिटेडचे मालकांनी कंपनी सोने आणि हिऱ्यांचे दागिने बनवते आणि निर्यात करते. या कंपनीचा देशातील सर्वात मोठा व्यवसाय आहे. राजेश एक्सपोर्ट हा एक बहुराष्ट्रीय सोने किरकोळ विक्रेता आहे. ज्याचे मुख्य कार्यालय बेंगळुरूमध्ये आहे. देशात आणि जगात एक प्रमुख सोने निर्यातदार म्हणून स्वतःची स्थापना केल्यानंतर राजेश मेहता हे बेंगळुरूच्या सर्वात श्रीमंत लोकांमध्ये गणले जातात.

व्यवसायात सातत्याने यश मिळवल्यानंतर राजेश मेहता यांनी अनेक देशांमध्ये सोन्याचे दागिने निर्यात करण्यास सुरुवात केली. जगातील सर्वात मोठी सोने कंपनी सोने शुद्धीकरणापासून ते दागिन्यांच्या विक्रीपर्यंत काम करते. राजेश मेहता यांच्याकडे सोने शुद्धीकरण कंपनीहीआहे. राजेश मेहता यांना सोने आणि चांदीचा व्यवसाय वारशाने मिळाला. त्यांनी तो हळूहळू तो वाढविला. आज त्यांनी त्यात स्वतःसाठी एक स्थान निर्माण केले आहे. शिवाय, त्यांचा व्यवसाय जागतिक उपक्रमात रूपांतरित झाला आहे.



जगातील सर्वात मोठी सोने शुद्धीकरण कारखाना स्वित्झर्लंडमधील वलकाम्बी येथे आहे. ही रिफायनरी राजेश मेहता यांच्या कंपनी राजेश एक्सपोर्टने विकत घेतली आहे. ही स्विस रिफायनरी दरवर्षी २ हजार टनांहून अधिक सोने, चांदी, प्लॅटिनम आणि पॅलेडियमवर प्रक्रिया करते. राजेश मेहता यांनी जुलै २०१५ मध्ये वलकाम्बीचा कारखाना हाती घेतला. आता, त्यांचा व्यवसाय वाढवल्यानंतर, त्यांच्याकडे स्वित्झर्लंड आणि भारतात दोन्ही ठिकाणी रिफायनरी आहेत.

राजेश मेहता यांच्या व्यवसायाचे प्रमाण राजेश एक्सपोर्ट्स जगातील ३५ टक्के पेक्षा जास्त सोने प्रक्रिया करते यावरून मोजता येते. त्यांचे वडील जसवंतरी मेहता दागिन्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी गुजरातहून कर्नाटकला गेले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर राजेशही त्यांच्या वडिलांच्या व्यवसायात सामील झाले. १९८२ मध्ये ते चेन्नईहून चांदीचे दागिने खरेदी करत होते. गुजरातमधील राजकोटमध्ये विकायचे. दागिन्यांच्या व्यवसायात यश मिळवल्यानंतर, त्यांनी बेंगळुरूमधील त्यांच्या एका छोट्या गॅरेजमध्ये सोन्याचे दागिने तयार करण्यासाठी एक छोटे युनिट सुरू केले. यात त्यांना मोठे यश मिळाले.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!






रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# श्री विष्णुसहत्रनाम स्तोत्राचा महिमा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्रामध्ये जीवनात उपयोगी येणारे काही मंत्र दडलेले असल्याचे धर्म ग्रंथांमध्ये सांगितले आहे.मात्र, सदर मंत्रांचे नियमित पठण व शुद्ध आचरण गरजेचे आहे.

**१) पोटाचे विकार दूर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
भ्राजिष्णुर्भोजनं भोक्ता सहिष्णुर्जगदादिजः।
अनघो विजयो जेता विश्वयोनिः पुनर्वसुः ।।

**२) मानसिक विकार दूर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
वैद्यो वैद्यः सदायोगी वीरहा माधवो मधुः ।
अतीन्द्रियो महामायो महोत्साहो महाबलः ।।

**३) स्मरणशक्ती वाढण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
महाबुद्धिर्महावीर्यो महा शक्तीर्महाद्युतिः ।
अनिर्देश्यवपुः श्रीमान् अमेयात्मा महाद्रिधृक ।

**४) इच्छा पूर्ण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
अससङ्ख्येयोऽप्रमेयात्मा विशिष्टः शिष्टकृच्छुचिः।
सिद्धार्थःसिद्धसङ्कल्पः सिद्धिदः सिद्धिसाधनः ।।

**५) रोग देशाकरिता खालील मंत्र म्हणावा.**
अमृतांशूद्भवो भानुःशशबिन्दुः सुरेश्वरः ।
औषधं जगतः सेतुः सत्यधर्मपराक्रमः ।।

**६) कार्यात यश मिळण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
भूतभव्यभवन्नाथः पवनः पावनऽनलः ।
कामहा कामकृत्कान्तः कामः कामप्रदः प्रभुः ।।

**७) विजय मिळविण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
युगादिकृद्युगावर्तो नैकमायो महाशनः ।
अदृश्यो व्यक्तरूपश्च सहस्त्रजिदनन्तजित ।।

**८) नोकरीत व व्यवसायात वाढ होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
व्यवसायो व्यवस्थानः संस्थानः स्थानदो ध्रुवः।
परर्द्धिःपरमस्पष्टस्तुष्टःपुष्टः शुभेक्षणः ।।

**९) साधनेतील बाधा कमी होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
वैकुण्ठः पुरुषः प्राणः प्राणदः प्रणवः पृथुः ।
हिरण्यगर्भः शत्रुघ्नो व्याप्तो वायुरधोक्षजः ।।

**१०) संकटात रक्षण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
ऋतुःसुदर्शनः कालः परमेष्ठी परिग्रहः ।
उग्रः संवत्सरो दक्षो विश्रामो विश्वदक्षिणः ।।

**११) अर्थ प्राप्तीसाठी आपण खालील मंत्र म्हणावा.**
विस्तार : स्थावरस्थाणुः प्रमाण बीजमव्ययम् ।
अर्थोऽनर्थो महाकोशो महाभोगो महधनः ।।

**१२) कल्याण होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
अनिवर्ती निवृत्तामा सङ.क्षेप्ता क्षेमकृच्छिवः ।
श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः श्रीमंतांवरः ।।

**१३) देवाची कृपा होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः ।
श्रीधरः श्रीकरः श्रेयः श्रीमाँल्लोकत्रयाश्रयः ।।

**१४) विवाह योग येण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
कामदेवः कामपालः कामी कान्तः कृतागमः।
अनिर्देश्यवपुर्विष्णुर्वीरोऽनंतो धनञ्जयः ।।

**१५) ज्ञान होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
ब्रह्मण्यो ब्रह्मकृद् ब्रह्मा ब्रह्म ब्रह्मविवर्धनः ।
ब्रह्मविद् ब्राह्मणो ब्रह्मी ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः ।।

**१६) मोक्षाकरिता खालील मंत्र म्हणावा.**
सद्गतिः सत्कृतिः सत्ता सद्भूतिः सत्परायणः ।
शुरसेनो यदुश्रेष्ठः सन्निवासः सुयामुनः ।।

**१७) वासनांचा नाश करण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
भूतावासो वासुदेवः सर्वासुनिलयोऽ नलः ।
दर्पहा दर्पदो दृप्तो दुर्धरोथाऽपराजितः ।।

**१८) शत्रूची पीडा कमी होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
सुलभः सुव्रतः सिद्धः शत्रुजिच्छत्रुतापनः ।
न्यग्रोधोदुम्बरोऽ श्वत्थश्चाणूरान्ध्रनिषूदनः ।।

**१९)चिंता दूर होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
सहस्त्रार्चिः सप्तजिह्वः सप्तैधाः सप्तवाहनः ।
अमूर्तिरनघोऽचिन्त्यो भयकृद्भयनाशनः ।।

**२०) वाईटस्वप्नाचा नाश होण्यासाठी खालील मंत्र म्हणावा.**
उत्तारणो दुष्कृतिहा पुण्यो दुःस्वप्ननाशनः ।
वीरहा रक्षणः सन्तो जीवनः पर्यवस्थितः ।।

# पंचप्राण, उपप्राण, चक्रे आणि अष्टभाव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपल्या देहात पाच मुख्य प्राण व पाच अष्टभाव उपप्राण आहेत, अशी मान्यता आहे. प्रत्येक प्राणाचे कार्य भिन्न-भिन्न आहे. चला, ते जाणून घेऊया.

## पाच मुख्य प्राण

१) प्राण २) अपान ३) व्यान ४) उदान ५) समान

**१) प्राण :** हा वायू हृदयात राहतो व श्वासोच्छवास करतो.
**२) अपान :** हा वायू मोठ्या आतड्यात राहतो व मलमूत्राचे विसर्जन करतो.
**३) व्यान :** हा सर्व शरीर व्यापून राहतो.
**४) उदान :** हा कंठात राहतो व अन्नरसाचे विभाजन करतो.
**५) समान :** हा नाभी कमलात राहतो व सर्व नाड्यांना अन्नरस पुरवितो.

## २) पाच उपप्राण

१) नाग २) कूर्म ३) कृकल ४) देवदत्त ५) धनंजय

**१) नाग :** हा वायू ढेकर निर्माण करतो. शरीरातील अशुद्ध तत्त्वे बाहेर टाकतो.
**२) कूर्म :** हा वायू पापण्यांची उघडझाप करतो.
**३) कृकल :** हा वायू शिंक व खोकला निर्माण करतो.
**४) देवदत्त :** हा वायू जांभई निर्माण करतो.
**५) धनंजय :** हा वायू मृत्यूनंतर आपल्या शरीरात राहतो. वातावरणातील पिशाच्चे शरीरात शिरणार नाहीत, याची काळजी घेतो.

यावरून एक गोष्ट लक्षात येईल, की मृतदेह जाळणे ही गोष्ट शास्त्रीय दृष्ट्या अतिशय चांगले आहे. कारण मृतदेह जाळल्याने धनंजय वायू शरीरात अडकून राहत नाही व जीवात्म्याचीही मायेतून त्वरित सुटका होते.

सिद्धपुरुषांचे देह चिन्मय असतात. त्यांचे देह पुरावेत व त्यावर समाधी बांधावी व त्या समाधीची पूजा करावी. अर्थात तेही सिद्धपुरुषाच्या इच्छेनुसार करावे. प्राणायाम ध्यान धारणा, इश्वरभक्ती इत्यादी साधनांनी आपल्या देहात असणारी कुंडलिनी व षड्चक्रे जागृत होतात व ध्यानामध्ये अतिशय दिव्य अनुभव येऊ लागतात.

## ३) चक्रे :



**मूलाधारचक्र :** मूलाधारचक्र जागृत झाल्यावर साधकाला मूलाधारचक्रामध्ये ऐरावताचे दर्शन होते. अथवा ॐ काराचे दर्शन होते. हे चक्र जागृत झाल्यावर साधक विद्वान बनतो. कवी बनतो गद्य-पद्याची रचना त्याच्या कडून होतात. ' गणपती ' ही या चक्राची देवता आहे.

**स्वाधिष्ठानचक्र :** स्वाधिष्ठानचक्र जागृत झाल्यावर ध्यानामध्ये एक मोठा देवमासा समुद्रात विहार करत आहे, असे दिसते. स्वाधिष्ठानचक्राची देवता ब्रह्मदेव असून येथे साधकांना ब्रह्मदेवाचे दर्शन घडते.

**मणिपूरचक्र :** मणिपूरचक्र जागृत झाल्यानंतर एक मेंढा अंगावर चाल करून येत आहे, असे दिसते. मणिपूरचक्राची देवता विष्णू असून, येथे साधकांना भगवान विष्णूंचे दर्शन घडते.

**अनाहतचक्र :** अनाहतचक्र जागृत झाल्यानंतर दशविध नाद ऐकू येतात. या नादावरच नंतर अनुसंधान ठेवायचे असते. या चक्राची देवता रुद्र (शंकर) ही असून, येथे साधकास साक्षात शंकराचे दर्शन घडते.

**विशुद्धचक्र :** विशुद्धचक्र जागृत झाल्यावर आपल्या म्हणजेच स्वस्वरूपाचे दर्शन होते. या चक्राची देवता जीवात्मा म्हणजे आपण स्वतःच येथे आपल्याला आरशात प्रतिबिंब पाहिल्याप्रमाणे आपलेच रूप दिसते, तसेच काही लोकांना येथे निळ्या रंगाचा हत्ती दिसतो अथवा निळा प्रकाश दिसतो.

**आज्ञाचक्र :** आज्ञाचक्र जागृत झाल्यानंतर अर्धनारीश्वराचे दर्शन होते. काही साधकांना हंसाचे दर्शन होते. आकाशात हंस विहार करताना दिसतो. काही साधकांना येथे अनेक देव-देवतांचीही दर्शने होतात व महत्त्वाचे म्हणजे आपल्या सद्गुरूंचे दर्शन होते.

**सहस्त्रारचक्र :** सहस्त्रारचक्र जागृत झाल्यानंतर साधकाला सिद्धावस्था प्राप्त होते. साधक जीवनमुक्त सिद्धपुरुष बनतो. येथे साधकाला परमेश्वराचे दर्शन होते व तो परमेश्वराशी एकरूप (शिवरूप) होतो.

## ४) अष्टभाव :

भक्त किती वर्षे मार्गामध्ये आहे. त्याच्या ज्येष्ठतेवरून त्याचा भक्तीमार्गातील प्रगती मोजमाप होत नसून तो कुठल्या स्थितीत यावरून त्याची आध्यात्मिक प्रगती ओळखली जाते.

**१) प्रथमभाव-स्वेद :** मंत्र, स्तोत्र, जप करताना ग्रंथपठण करताना शरीराला घाम येतो, हा प्रथम भाव. असा अनुभव येत असेल तर त्याचा अर्थ त्याची सेवा पूर्वजन्मातील प्रारब्द शुद्ध करण्यात खर्च होते.

**२) दुसरा भाव-कंप :** या भावात पोहोचविल्यावर भक्ताला शरीराला कंप सुटतो. शरीरात कंप जाणवते.

**३) तिसरा भाव-रोमांच :** स्वामींचा अगर इतर देवांचा जप करताना, पोथी वाचताना, अनुभव सांगताना शहारे आले तर सेवेत तिसरा भावात समजवा.

**४) चतुर्थ भाव- अश्रू :** महाराजांचे आठवणीने हृदय भरून आले, तर आनंदाश्रू येतात. हा भाव सेवेकऱ्याच्या हृदयाची शुद्धी करतो. अशा सेवेकऱ्याकडून स्वामी काव्यही निर्माण होते. खरे म्हणजे या भावात गेल्यावर सेवाकाल वाढवायला हवा. निदान एकच आसनावर बसून एका तासावर जप करायला हवा. अशी दीड वर्ष साधना केली तर भक्त पंचम भावात प्रवेश करतो.

**५) पंचम भाव-सत्वापत्ती :** या भावात प्रवेश केल्यावर अनुसंधान जास्त वेळ टिकते. अंतर्गत ईश्वरीय संकेत मिळतात. स्वामीमय होऊन जातो. पण सर्वसामान्य माणसे चौथ्या भावापर्यंत या जन्मात पोहोचतात व पुढच्या जन्मात पुढचा आध्यात्मिक प्रवास सुरू होतो.

**६) षष्ट भाव-समाप्ती :** या भावात प्रवेश झाल्यावर हळूहळू सुख-दुःख, मान-अपमान, निंदा-स्तुती सर्व समान वाटू लागतात. अभिमान, अहंकार नष्ट व्हायला सुरूवात होते. सद्गुण वाढू लागतात.

**७) सप्तम भाव-असंसक्ती :** सातव्या भावात प्रवेश केल्यास देवतांचे दर्शन-साक्षात्कार-संभाषण होतात. षटचकरे जागरूक होतात, इतरांचे भूत-भविष्य समजते, बोललेले शब्द सत्य होतात. या भावात गुरू दुर्लक्ष करतात. साधकाला स्वबळावर आपली प्रगती करावी लागते व जनकल्याणाचे कार्य करावे.

**८) अष्टमभाव-प्रलय :** या भावात साधक इश्वराशी एकरूप होतो. सिद्ध अवस्था प्राप्त होते. पुढील जन्मातही ते सर्व विभागांत काम करून जनकल्याणाचे कार्य करतात.

# भोजनासंबंधी १२ महिन्यांचे नियम

**१) चैत्र (मार्च-एप्रिल ) :**
या काळात गुळाचे सेवन करू नये. सकाळी रिकाम्यापोटी कडुनिंबाची ४-५ पाने, कडुनिंबाच्या झाडाची आंतरसाल यांचा एक कप काढा घेतल्याने बरेच आजार ठीक होतात.

**२) वैशाख (एप्रिल-मे ) :**
या महिन्यात तेलाचा आहारात कमीतकमी उपयोग केला पाहिजे. कारण या काळात शरीरात रोग होण्याची शक्यता जास्त असते. या महिन्यात बेलाच्या पानांचे सेवन अतिशय लाभदायक असते.

**३) ज्येष्ठ (मे-जून) :**
या महिन्यात ऊन जास्त प्रमाणात असल्यामुळे दुपारी एखादा तास झोपले पाहिजे. या काळात शिळे अन्न बिलकूल खाऊ नये. शिळ्या अन्नामुळे आजारी पडण्याची शक्यता जास्त असते.

**४) आषाढ़ (जून-जुलै) :**
या महिन्यात सर्वांनी आपल्या वयानुसार शक्य होईल तेवढा व्यायाम आणि खेळ खेळला पाहिजे. या काळात पचनशक्ती कमी असते. हलका आहार घ्यावा. बेलाचे सेवन करू नये.



**५) श्रावण (जुलै-ऑगस्ट) :**
या काळात हिरव्या पालेभाज्या आणि दूध आरोग्यवर्धक आहे. या महिन्यात हिरड्याचे सेवन जरूर करावे.

**६) भाद्रपद (ऑगस्ट -सप्टेंबर) :**
हा पावसाळ्यामधील शेवटचा काळ. आजूबाजूला डबकी साचलेली असतात. संसर्गजन्य रोग असतात. दवाखान्यात गर्दी असते. रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारी आयुर्वेदिक औषधे घ्यावीत.

**७) आश्विन (सप्टेंबर-ऑक्टोबर) :**
या काळात गुळाचे सेवन आरोग्यवर्धक आहे. या महिन्यात कारले खाऊ नये.

**८) कार्तिक (ऑक्टोबर-नोव्हेंबर) :**
या महिन्यात ताक पिणे हानिकारक आहे. मुळा लाभदायक आहे.

**९) मार्गशीर्ष (नोव्हेंबर-डिसेंबर) :**
हा आरोग्यवर्धक महिना आहे. व्यायाम करणे फायदेशीर आहे. या काळात जास्त थंडी असते. या काळात जास्त गरम, जास्त थंड पदार्थांचे सेवन करू नये.

**१०) पौष (डिसेंबर-जानेवारी) :**
या महिन्यात दूध पिणे आरोग्यवर्धक आहे. पण या काळात धने-धने कूट भाजीत वापरू नये.

**११) माघ (जानेवारी-फेब्रुवारी) :**
या काळात शुद्ध तुपाचे सेवन आरोग्यवर्धक आहे. या महिन्यात खडीसाखर खाऊ नये.

**१२) फाल्गुन (फेब्रुवारी-मार्च) :**
या महिन्यात सकाळी गार पाण्याने स्नान करणे आरोग्यवर्धक असते. या काळात चणे खाणे हानिकारक असते.

सर्वांनी चांगल्या आरोग्यासाठी सर्वच महिन्यांत रोज सकाळी व्यायाम केला पाहिजे. तसेच आरामही आवश्यक आहे. रात्री दही सेवन करू नये. आयुर्वेद ही काळाची गरज आहे.

# जपामुळे मनाची शुद्धी!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपल्याला आवडणारा कोणताही जप मनातल्या मनात सतत चालू ठेवावा. त्यामुळे मन शांत होऊन ते शुद्ध होते. जपाचे फळही मिळते. मानसिक जपाला कोणत्याही अशुद्धीचे दोष नसतात. कारण ' मन चंगा तो कटोर में गंगा ' अशी म्हणच आहे. सततच्या मानसिक जपामुळे मनाची शुद्धी होते आणि न होणाऱ्या गोष्टी देखील होऊ लागतात. अमूकच मंत्र म्हटला पाहिजे, असे अजिबात नाही.

तुम्हाला जो आवडेल तो कोणताही मंत्र किंवा स्तोत्र मनातल्या मनात तुम्ही म्हणू शकता. त्यामुळे कोणतीही संकटे येत नाहीत. आलीच तरी त्यातून आपोआप मार्ग मिळत जातो. कारण मंत्रजपामुळे आपल मन शुद्ध झालेले असते. कोणत्याही वाईट शक्तींचा प्रभाव आपल्यावर पडत नसतो. पण काही उग्र मंत्र मात्र वाटेल तेथे म्हणू नये. कारण त्यासाठी पावित्र्य आवश्यक आहे. उदा.- गणेशोत्सव काळात पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर हजारो पुरुष- स्त्रिया कुठेही बसून अथर्वशीर्ष म्हणतात. वास्तविक हे चुकीचे आहे. देवासमोर बसून म्हणणे वेगळे आणि रस्त्यावर कुठेतरी उभे राहून म्हणणे वेगळे. कारण अथर्वशीर्ष हा वैदिक मंत्र असल्यामुळे त्याला पावित्र्य फार लागते. पण कुणाला सांगणार? आणि कोण ऐकणार? कुणाला सांगायला गेले, की तुम्हाला काय समजते? असे म्हणणारे लोक आहेत. पण वैदिक मंत्राचे पावित्र्य भंग झाल्यावर नंतर जे काही त्रास सुरू होतात हे त्यांना त्यावेळी कळत नाही. ज्यावेळी समजते त्यावेळी वेळ निघून गेलेली असते. आम्ही घरात देखील सायंकाळी देवासमोर दिवा लावायचा असेल, तर अंघोळ करून मगच दिवा लावतो. कारण दिव्यालाही अतिशय पावित्र्य लागते.

